Vol 3 Issue 11 Dec 2013
ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-11, Dec-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# बिडी उद्योगातील महिला कामगारांच्या समस्या : समाजशास्त्रीय अध्ययन
## (संदर्भ : दत्तनगर, नांदेड, जि. नांदेड)

**ए. टी. शिंदे**
प्रमुख, समाजशास्त्र विभाग, इंदिरा गांधी महाविद्यालय, सिडको नांदेड

***सारांश:***भारतीय समाजात पुरूषप्रधान समाज संरचना असल्यामुळे महिलांना सार्वजनिक जीवनात दुय्यम लेखण्यात येते. त्यात बिडी महिला कामगार हया वंचितपेक्षा अधिक वंचित आहेत. जातीव्यवस्था, भांडवलशाही व्यवस्था आणि पुरूषप्रधान व्यवसाी या तीन शोषण पोषक व्यवस्थेमुळे सामाजिक, आर्थिक, शारीरिक व मानसिकदृष्ट्या स्त्रीया शोषणाच्या बळी ठरत आहे.

***प्रस्तावना:—***

नांदेड जिल्हा हा ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक भौगोलिक, राजकीय इ. दृष्ट्या अत्यंत महत्वाचा आहे. शिखांचे दहावे गुरू श्री गुरू गोबिंदसिंघजी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला, गोदावरी नदीचे विशेष वरदान असलेला हा जिल्हा कापूस उत्पादनात अग्रेसर आहे. याच पिकावर आधारित येथे कापड उद्योगाचा व्यवसाय जोरात चालत होता. हा जिल्हा आंध्रप्रदेश, कर्नाटक या दोन राज्यास लागून असल्यामुळे कापड उद्योगात काम करण्यासाठी शेजारील राज्यातील कामगार मोठ्या प्रमाणात नांदेड येथील कापड उद्योगात काम करू लागले. 17 सप्टें 1947 रोजी वल्लभाई पटेल, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली मराठवाड्यासह नांदेड जिल्ह्याचे भारतात विलनणीकरण करण्यात आले. त्याचबरोबर निझाम संस्थानिकांनी सुरू केलेले कापड उद्योग, उस्मानशाही मिल बंद पडली त्यामुळे हजारो लोक बेरोजगार झाले. तेव्हाच कर्नाटक आंध्रप्रदेश सीमालगत भागात तंबाखूचे पिक मोठ्या प्रमाणात घेतले जात असे त्यावर आधारित बिडी उद्योग सुरू करण्यात आला. महाराष्ट्र आंध्रप्रदेश सीमालग भागातील बहुसंख्य लोकांना रोजगाराचे साधन आणि जगण्यासाठी आशेचा किरण मिळाला.

तथापि, कालांतराने तंबाखूचे दुष्परिणाम होऊन फुफूसाचे आजार, क्षयरोग, दमा, संधिवात, खोकला, तोंडाचा कर्करोग असे रोग मोठ्या प्रमाणात लोकांना होऊ लागल्यामुळे शासनाने तंबाखू, सिगारेट बरोबरच बिडी सारखे तंबाखूजन्य उद्योगही हळूहळू बंद करण्याचे ठरविले. त्यामुळे बिडी सारख्या उद्योगाला उतरती कळा लागली. अशाच परिस्थितीत दत्तनगर नांदेड येथील बिडी कामगार बिडी वळण्याचे काम करतात. जेथे कोणत्याही प्रकारच्या मुलभूत नागरी सुविधा आढळून येत नाहीत. या परिस्थितीत ज्याचे पती व्यवनाधिन आहेत अशा स्त्रीया आणि विधवा स्त्रिया बिडी उद्योग करून उदरनिर्वाह करतात. या स्त्रीया 12 ते 14 तासापेक्षा जास्त काळ एकाच स्थितीत बसून यंत्रवत काम तर करतात, पण मजुरी मात्र 1000 बिड्यास 110 ते 120 रू मिळते. अशा अत्यंत भिषण आर्थिक विवंचनेत हे महिला कामगार सापडले आहेत अन्न, वस्त्र, निवारा या तीन गरजांची पुर्ती करण्यातच त्यांचे संपूर्ण आयुष्य संपून जाते. शिक्षण, आरोग्य या गरजांकडे त्या अजिबाज लक्ष देऊ शकत नाहीत. या पार्श्वभूमीवर त्याच्या समस्याचे अध्ययन करण्यात येत आहे.

***उद्देश*** :

1. बिडी कामगारांच्या कच्च्यामालाच्या समस्येचे अध्ययन करणे.
2. बिडी महिला कामगारांच्या मजुरी विषयक समस्येचे अध्ययन करणे.?
3. बिडी महिला कामगारांच्या बेरोजगारीच्या समस्येचे स्वरूप जाणून घेणे.
4. बिडी महिला कामगारांचा सामाजिक दर्जा अभ्यासणे.
5. बिडी महिला कामगारांच्या आरोग्य विषयक समस्या जाणून घेणे.

***अध्ययन पध्दती :***

***संशोधन आराखडा :*** प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला आहे.

***तथ्य संकलन पध्दती :*** प्रस्तुत शोध निबंधासाठी प्राथमिक स्त्रोतात मुलाखत अनुसूची आणि दुय्यम स्त्रोतांमध्ये पुस्तके, मासिके, संदर्भग्रंथ, इंटरनेट, वेवसाईट, वर्तमानपत्र इत्यादीचा वापर केला आहे.

***तथ्याचे विश्लेषण व निर्वाचन :*** तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी आशय विश्लेषण पध्दतीत उपयोग केला आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी बिडी महीला कामगार विशयी सुविधाजन्य कायद्याच्या पूर्तीचा दृष्टिकोण ठेवलेला आहे.

***गृहितकृत्ये***

1. बिडी कामगारांना कच्यामालाचा योग्य प्रमाणात पुरवठा होत नाही.
2. बिडी महिला कामगारांना अत्यल्प मजुरी मिळते.
3. बिडी महिला कामगारांना बेरोजगारीला सामोरे जावे लागते.
4. बिडी महिला कामगार सामाजिक सुरक्षेविशयी अनभिज्ञ आहेत.
5. बिडी महिला कामगारांचा सामाजिक दर्जा निम्न आहे.
6. बिडी महिला कामगारांचे आरोग्यविशयक प्रश्न गंभीर आहेत.

***अध्ययन क्षेत्र : एक दृष्टिक्षेप***

प्रस्तुत शोध निबंधासाठी नांदेड शहरातील दत्तनगर या बिडी कामगार क्षेत्राची निवड केली आहे. दत्तनगर मध्ये मजूर छाप बिडीचा एक कारखाना, चारभाई बिडीचा एक कारखाना आणि कोंबडा छाप बिडीचा एक कारखाना असे तीन कारखाने आहेत. या कारखान्यांमध्ये अनुकमे 182, 250, 100 असे मिळून 532 बिडी

महिला कामगार बिडी वळण्याचे काम करतात. या बिडी महिला कामगारांपैकी नमुना निवडतांना शेकडा 5 प्रमाणे सहेतूक नमुना निवड प्रकाराच्या आधारे 27 महिला कामगारांची अध्ययनासाठी नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे.

### *बिडी महिला कामगारांच्या समस्या*

#### *1. कच्यामालाच्या मूबलक पूरवठ्याचा अभाव*

नांदेड शहरातील दत्तनगर मधील सर्व बिडी कामगार महिलांनी तेन्दुपत्ता आणि तंबाखू च्या पूरवठ्याचा अभाव आहे असे सांगितले. बिडी कामगारांना पुरेश्या प्रमाणात तेंदूपत्ता उपलब्ध होत नाही. तो मिळविण्यासाठी व्यवसायातील कमीशन एजंट, ठेकेदार यांच्या सोबत रोजगाराच्या दिवसात संघर्ष, भांडणे होणे, एक सामान्य व नित्याची बाब झाली आहे. हे दृश्य रोज कमीशन एजंटच्या घरी सकाळच्या प्रहरीच पाहावयास मिळते. कच्चामाल, तेंदूपत्ता, तंबाखू वाटपा संबंधी दोन प्रमुख समस्या सर्वेक्षणाद्वारे समोर आल्या आहेत.

1. या बिडी कामगारांना शासनाने निर्धारित केलेल्या प्रमाणात तेन्दुपत्ता 800 ग्राम, तंबाखू 300 ग्राम प्रती हजार बिडीसाठी कच्चामाल उपलब्ध होत नाही. बिडी कामगारांना हजार बिडी बनविण्यासाठी लागणाऱ्या 800 ग्राम पत्ता ऐवजी केवळ 600 ग्राम तेंदू पत्ताच दिल्या जातो.
2. त्यापैकी 50–100 ग्राम तेंदूपत्ता खराब निघतो, ही नित्याची बाब झाली आहे. जंगलातून तेदू पत्ता टेंडर, तोडणे, वाळवणे, त्याचे गट्ठे बांधणे, त्यांचा बिडी कामगारापर्यंत आणण्याच्या प्रक्रियेत विलंब लागत असल्यामुळे बरेचसे तेंदूपत्ते खराब निघतात. बऱ्यादा सुदैवानेच त्यांच्या काही गठ्यातील सर्व तेंदूपत्ते हे उत्तम दर्जाचे असतात. कारण कमीशनदार, ठेकेदारांना जर चांगल्या दर्जाचा तेंदूपत्ता मागीतला जर 'काम सोडून घरी बसा' अशी धमकी वजा सूचना ठेकेदाराकडून मिळते. त्यामुळे खराब निघालेल्या तेंदूपत्याची भरपाई बिडी मजूरांना स्वतःच्या मेहनतीच्या पैसातून करावी लागते. त्यांच्या शिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्याय नाही. आपल्या पैशाने तेंदमपत्ता खरेदी करणे त्यांच्यासाठी कमप्राप्त ठरते. आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालावा. यासाठी वळोवेळी नियतीशी करार करून बिडी महिला कामगार जीवन जगत असतात.

#### *2. अत्यल्प वेतन*

बिडी महिला कामगारांची अत्यल्प वेतन ही देखील महत्वाची समस्या आहे. बिडी वळण्यासाठी मजूर आपल्या रक्ताचे पाणी करतो. आपल्या शारीरिक व्याधकडे दुर्लक्ष करून बिडी वळण्याचे काम करतो. तरी त्यांना दर हजारी बिडयामागे 95 ते 114 रू. मिळतात. शासनाच्या धोरणानुसार किमान 125 रूपये किमान वेतन ठरविण्यात आल आहे. दुर्दैवाने 14 ते 15 तास काम करून या बिडी कामगारांना सरकारकडून ठरवलेली किमान मजूरी 125 देखील मिळत नाही. 'बिडी वळणे' हेच मजुरांच्या जीवनाचे अंतिम ध्येय बनले आहे. सकाळी 5 वाजल्यापासून रात्री 11 वाजेपर्यंत कधी कधी तर मेणबत्तीच्या अंधूक प्रकाशात आपले प्राण ओतून बिडया तयार केल्या तरी त्यांना योग्य मोबदला मिळत नाही. अत्यल्प वेतन मिळत असल्यामुळे त्यांना आपला उदरनिर्वाह करणे देखील कठीण दिसून येतात. इतर क्षेत्रात मात्र 08 तास काम केल्यानंतर 200 ते 250 रूपये मजूरी मिळते. तर बिडी कामगारांना दिवसाकाठी फक्त त्यांच्या अर्धेवेतन म्हणजे 95 ते 114 रूपये वेतन मिळते.

#### *3. बेरोजगारीची समस्या*

बिडी कामगारांना मागील वर्षी तयार केलेल्या बिडयांची विक्री झाली नाही. म्हणून बिडी कंपनीद्वारे सरासरी 15 दिवसच काम मिळते. बहुतेक मजुरांना असे वाटते की, दिवसेंदिवस बिडी उद्योग हा घटत चालला आहे. या व्यवसायातील रोजगाराच्या संधी दिवसेंदिवस कमी होत आहेत. काही कामगार दुसऱ्या रोजगाराच्या शोधात शहरामध्ये फिरतात. परंतु नवीन व्यवसाय उपलब्ध होत नाही. दुसरे काम मिळत नाही. म्हणून इच्छा असूनही दुसऱ्या व्यवसायामध्ये बिडी कामगार जावू शकत नाही. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय दर्जेदार तंबाखू उत्पादने बाजारात येत आहेत. त्या उत्पादनांच्या स्पर्धेत बिडी उत्पादन टिकत नाही. तसेच भारत सरकारनेही तंबाखूजन्य पदार्थाच्या निर्मिती, खरेदी व विक्रीवर बंधने घातल्यामुळे या व्यवसायाचे क्षेत्र दिवसेंदिवस मर्यादित होत आहे. त्यामुळे बिडी कामगारांना आपला व्यवसाय टिकवण्याचे मोठे संकट उभे राहीले आहे. याशिवाय दुसरे व्यवसायिक कौशल्य शिकण्यासाठी त्यांच्याकडे वेळ, पैसा उपलब्ध नाही.

#### *4. आरोग्य विषयक समस्या*

तंबाखूजन्य पदार्थाशी संबंध हा दैनंदिन जीवनाचा भाग बनल्यामुळे बिडी मजूरांना तंबाखूच्या सेवनाचे व्यसन लागते. दिलेले कार्य वेळेत पूर्ण होण्यासाठी जास्त तिव्रतेने, गतीने अन्नपाण्याशिवाय काम करता यावे म्हणून हे मजूर तंबाखूचे सेवन करताना आढळून आले आहेत. परिमाणतः हळूहळू त्यांना फुफुसाचे विविध आजार होण्याची शक्यता अधिक असते. तंबाखूतील तिव्र आशा 'निकोटीन' या विषारी व हानिकारक रसायनामुळे 15 ते 20 वर्षात त्यांना तोंडाचा कर्करोग, रक्ताचा कर्करोग होतो, तसेच दमा, पाठदुखी, संधिवात, हाडाचे दुःखणे, पाठ दुखणे, मानेचे आजार असे अनेक शारीरिक विकार बिडी महिला कामगारांना जडतात. त्याचबरोबर रात्रभर कमी प्रकाशात बिडी वळण्याचे कार्य केल्यामुळे त्यांना दृष्टी दोशाच्या अनेक विकारांना सामोरे जावे लागते.

वरील उल्लेखलेल्या व्याधीग्रस्तव्यक्तीची व्यावसायिक क्षमता कमी होऊन तो दिवसाकाठी फक्त 500 ते 600 बिडया वळू शकतो. दारिद्रय, गरिबी, बेरोजगारी इ.मुळे अशा मोठया रोगाचा इलाज हे व्यक्ती करू शकत नाहीत, त्यामुळे मृत्यूची वाट बघत बघत ते आपले उर्वरित आयुश्य जगताना दिसतात. वैद्यकीय उपचाराअभावी बिडी महिला कामगाराचे आयुष्य जिवंतपणी नरक यातना भोगते. तसेच शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या विविध शासकीय, वैद्यकीय योजनांची माहिती कामगारांना नसल्यामुळे आपल्या नशिबाला दोष देत जीवन जगण्यापेक्षा दुसरा कोणताही पर्याय त्यांच्या कडे उरत नाही.

#### *5. सामाजिक सुरक्षा कायदयाविषयी अनभिज्ञता*

बिडी महिला कामगारांसाठी विविध सामाजिक सुरक्षा विशयक कायद्यांची निर्मीती शासनाने केलेली आहे. त्यासाठी कामगारांना आवश्यकत्या विहित नमुन्यातील कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. परंतु अज्ञान, अशिक्षितपणा, जागृकतेच्या अभावामुळे कोणतीही आवश्यक ती कागदपत्रे त्यांच्याकडे नसतात. बिडी व्यावसायिक कामगार म्हणून अनेक कामगाराची सहाय्यक आयुक्त कार्यालयात नोंद नसल्यामुळे सामाजिक सुरक्षा कायद्याने मिळणारे लाभ त्यांना मिळाले नाहीत. उदा. बिडी मजुरांसाठी शासनाने एक ओळखपत्र दिले आहे. परंतु हे अत्यावश्यक असे ओळखपत्र कामगारांकडे उपलब्ध नसल्यामुळे अनेक बिडी कामगार यांच्या लाभापासून वंचित राहतात त्यातचिकित्सा, वैद्यकीय सुविधा,

गृहकर्ज, मुलांना शिष्यवृत्ती, अजीवन पेन्शन योजना, अकार्यक्षम मजूर पेन्शन योजना, विधवा व विधूर पेन्शन योजना इत्यादी, या योजनेच्या फायद्यासाठी ओळखपत्र आवश्यक असते. तेच महिला कामगारांकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यांना सामाजिक सुविधेच्या सुरक्षिततेच्या लाभापासून वंचित राहावे लागते.

### *6. सामाजिक दर्जा संदर्भात समस्या*

एक व्यक्ती म्हणून जीवन जगत असतांना लागणाऱ्या अत्यावश्यक गरजा उदा. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य यापासून बहुसंख्य बिडी महिला कामगार वंचित असल्याचे दिसून येते. रोज त्यांना दोन वेळेचे जेवन करणे उपलब्ध होईल की नाही?याची चिंता असते. उद्या आपणास खायला काही मिळेल की नाही? याची खात्री कोणालाही देता येत नाही. ज्या ठिकाणी हे मजूर वास्तव्य करून राहतात. तेथे शुध्द पाणी, स्वच्छ हवा, भरपूर सूर्यप्रकाश, रस्ते, वीज, पक्के घर, आरोग्यविषयक सुविधा इत्यादीचा अभाव आढळून येतो. दारिद्रयामुळे महिला कामगारांच्या मुलांना कुपोषणास सामोरे जावे लागते. गरिबीमुळे शाळेची फीस परवडत नाही त्यामुळे मुलांना शाळेत पाठवू शकत नाहीत. वस्तीमध्ये हातपंप, नळ आहेत. त्यातूनही शुध्द पाण्याचा पुरवठा केला जात नाही. त्यांच्यात निरक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे त्यांचा सामाजिक दर्जा हा अत्यंत निम्न स्वरूपाचा आहे.

### *7. कर्जबाजारीपणा*

बिडी वळणाच्या उद्योगातून उदरनिर्वाह सुध्दा होत नाही. कुटुंबातील महत्वाच्या प्रसंगी उदा. विवाह, मुलांचे शिक्षण, मोठा सण, दुधासाठी एखादा प्राणी घेणे, मोठया आजाराचा उपचार करण्यासाठी बिडी महिला कामगारांना सावकारांडून कर्ज घ्यावे लागते. बिडी महिला कामगाराचे उत्पन्न अत्यंत कमी असल्यामुळे कोणतीही बॅंक त्यांना कर्ज देत नाही. त्यामुळे खाजगी संस्था, व्यक्ती, नातेवाईकांकडून जास्तीच्या व्याजाने पैसे घेतले जातात. ते परत न केल्यामुळे व्याजावर व्याज लावून कर्जाचा डोंगर चढत जातो. आणि त्यांच्या आयुश्यातील कर्जबाजारीपणाची समस्या कायम टिकून राहते.

### *8. मनोरंजन विषयक समस्या*

व्यवसाय करतांना मानसिक ताणतणाव कमी व्हावा, यासाठी मनोरंजनाची आवश्यकता असते. त्यातून कार्य करण्याची प्रेरणा मिळते. बिडी महिला कामगार पारंपारिक गिते, रेडिओ, अकाशवाणी, टेपरेकॉर्डर द्वारे मनोरंजन करतात. कोणतेही आधुनिक मनोरंजनाचे साधन त्याच्याकडे उपलब नाही. म्हणून त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतांना दिसतो.

### *9. कामगार कायद्येविषय अज्ञान*

बहुतेक बिडी महिला कामगार असंघटित आहेत. त्यामुळे नोंदणीकृत संघटनेचा कोणताही लाभ या महिलांना मिळकत नाही. कामगार विशयक प्रमुख कायदे उदा. कामगार संघटना कायदा 1926, मजूरी कायदा–1936, किमान वेतन कायदा 1948, फॅक्ट्री ॲक्ट 1948, बिडी व सिगार ॲक्ट 1966, कामगार प्रोव्हिडेट फंड कायदा–1976 या सर्व कायद्यांच्या पासून बिडी महिला कामगार अनभिज्ञ आहेत. त्यांना जेव्हा या कायद्या संबंधी विचारले, तेव्हा त्यांनी ते पहिल्यांदा हे कायदे ऐकत असल्याने आश्चर्य चकित भाव चेहऱ्यावर व्यक्त करतांना दिसले. तथाकथित नेतृत्वाने वारंवार वेगवेगळया सुविधा प्राप्त करून देतो, म्हणून फसवणूक केली. त्यामुळे तथाकथीत नेतृत्वावर कामगारांचा विश्वास नाही. महिला कामगार संघटनेसाठी वेळ, श्रम, पैसा खर्च करू शकत नाहीत. म्हणून बिडी कामगारांची कोणतीही संघटना अस्तित्वात येवून प्रभावीपणे कार्य करू शकली नाही. संघटनेच्या अभावी प्रत्येक बिडी मजूर वैयक्तिक पातळीवर या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतो आहे. परंतु अपेक्षित यश येत नाही. त्याचे अधिकाधिक शोषणच होतांना दिसून येते.

### *सारांश*

बिडी उद्योगातील महिला कामगार हया असंघटित क्षेत्रात काम करीत असल्यामुळे शासनाकडे त्यांचे कुठलेही अद्यावत रेकॉर्ड उपलब्ध नाही. या कामगारांकडे इतर व्यवसायाचे कोणतेही कौशल्य नसल्यामुळे किंबाहुना हाच व्यवसाय बालपणापासून करीत असल्यामुळे या व्यवसायातील भिशण शोशणास सामोरे जावे लागत आहे.

या व्यवसायातून त्यांच्या मूलभूत गरजांची पुर्तता होत नाही. तरीही इच्छा असूनही परंतू पैसा उपलब्ध नसल्यामुळे याच बिकट परिस्थितीत जीवन जगतात. याचा फायदा घेत बिडी ठेकेदार, एजंट, बिडी चेकर असे पुरूष या स्त्रियांचे आर्थिक, शारीरिक व मानसिक शोषण करतात. हया महिला अनोंदणीकृत असल्यामुळे त्यांना न्याय देतांना शासनापुढे अनेक कायदेशीर अडचणी येतात. म्हणून बिडी महिला कामगार सामाजिक न्यायापासून वंचित राहतात. कधीतरी परिस्थिती बदलेल व सुखाचे दिवस येतील, या आशेवर हे कामगार मरण यातना सोसत आहेत. त्यांच्याकडे वेळीच शासन, समाज व निमशासकीय संस्थानी लक्ष देऊन कायमस्वरूपी व्यवसाय उपलब्ध करून द्यावा तरच हरवलेला आत्मसन्मान हया बिडी महिला कामगार प्राप्त करू शकतील.

### *संदर्भग्रंथ सूची*

1. यादर रवि प्रकाश, दीप रागिनी, रॉय पूजा, (2010) ''भारत मे महिला श्रमिक'', एटलॅनटिक पब्लीकेशन ॲन्ड डीस्ट्रीब्युशन, दिल्ली.

2. डॉ. गोविंद प्रसाद, (2007) ''महिला एवं बाल श्रमिक सामाजिक समस्याएँ'', डिस्कव्हरी पब्लीशिंग हाऊस, नई दिल्ली.

3. रावत ज्ञानेंद्र, (2013) '' औरत एक समाजशास्त्रीय अध्ययन'', विश्वभारती पब्लिकेशन, नई दिल्ली.

4. डॉ. अंजली जोशी टेंभूर्णीकर, (2007) ''असंघटित क्षेत्रातील बालकामगार'', प्रकाशक : डॉ. बा. ल. जोशी, औरंगाबाद.

5.नालगौंडे गुरूनाथ, (1978) ''औद्योगिक समाजशास्त्र'' कॉन्टींनेन्टल प्रकाशन, पुणे,

6.बोधकर सुधीर, कुलकर्णी मृणाल, कानेटरक मेघा, (2007) ''औद्योगिक संबंध आणि श्रमकायदे'', श्री. साईनाथ प्रकाशन धमरपेठ, नागपूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- ✶Google Scholar
- ✶EBSCO
- ✶DOAJ
- ✶Index Copernicus
- ✶Publication Index
- ✶Academic Journal Database
- ✶Contemporary Research Index
- ✶Academic Paper Databse
- ✶Digital Journals Database
- ✶Current Index to Scholarly Journals
- ✶Elite Scientific Journal Archive
- ✶Directory Of Academic Resources
- ✶Scholar Journal Index
- ✶Recent Science Index
- ✶Scientific Resources Database
- ✶Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net